सत्यमेव जयते


अपर पोलीस महासंचालक (वाहतुक),
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय,
मोती महल, ६ वा मजला, १९५, जे. टाटा मार्ग,
सी.सी.आय. क्लब जवळ, सम्राट रेस्टॉरंट समोर,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दुरध्वनी क्र. :(०२२) - २२८२ ०३११
E-mail :
adg.traffic.hsp@mahapolice.gov.in


जा.क्र. अपोमसं (वा.)/वा/२२२६/२०२१

दिनांक : ०९/०९/२०२१

09 SEP 2021

प्रति,

मा. पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय:- महामार्ग पोलीस विभागाची आदर्श कार्यप्रणाली (STANDARD OPERATING PROCEDURE)

उपरोक्त विषयास अनुसरून आपण आदेशित केल्यानुसार महामार्ग पोलीस विभागाचा आदर्श कार्यप्रणालीचा मसुदा सोबतप्रमाणे अवलोकनार्थ व मार्गदर्शनार्थ सादर करण्यात येत आहे.

( डॉ. भूषणकुमार उपाध्याय )
अपर पोलीस महासंचालक (वा.),
महाराष्ट्र राज्य, मुंबई

# महामार्ग पोलीस विभागाची आदर्श कार्यप्रणाली
# (STANDARD OPERATING PROCEDURE)

## इतिहास :-

- दि. १५ एप्रिल १९४८ रोजी राज्य वाहतूक शाखेची स्थापना करण्यात आली. या शाखेकडे राज्यामधील महामार्गावरील गस्त, वाहतूक नियंत्रण तसेच वाहतूक सुरक्षितता व सुविधाचे कामकाज सोपविण्यात आले. सदर शाखेचे कामकाज व नियंत्रण पोलीस उपमहानिरीक्षक (वाहतूक) यांचे अधिपत्याखाली होते. पोलीस उपमहानिरीक्षक (वाहतूक) हे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयातून या शाखेचे कामकाज पाहत होते.

- दिनांक १३जानेवारी १९८४ रोजी केंद्र शासनाचे शिफारस व धोरणानुसार राज्य वाहतूक शाखेच्या अंतर्गत राज्यातील तत्कालीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ (मुंबई-सातारा-कोल्हापूर) मार्गावर प्रथम १० वाहतूक मदत केंद्र स्थापन करण्यात आली.

- २ मार्च १९८८ पासून राज्य वाहतूक शाखा शासनाने बंद केली आणि राज्य वाहतूक शाखेच्या उपलब्ध मनुष्यबळ व साधनसामुग्रीमधून नव्याने १३ महामार्ग वाहतूक मदत केंद्रांची (**Highway Traffic Aid Branch**) प्रायोगिक तत्वावर स्थापना करण्यात आली.

  राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ (मुंबई-सातारा-कोल्हापूर) मार्गावर कार्यान्वित करण्यात आलेली १० वाहतूक मदत केंद्र आणि नव्याने सुरु करण्यात आलेली १३ केंद्रे मिळून एकूण २३ महामार्ग वाहतूक मदत केंद्रे राज्यातील महामार्गावर कार्यान्वित करण्यात आली आणि सदर मदत केंद्रांचे कामकाज संबंधीत शहर पोलीस आयुक्त व जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे आस्थापनेकडे वर्ग करण्यात आले.

- राज्यातील राष्ट्रीय व राज्य महामार्गावरील प्रवाशांचे खून, दरोडे, चोऱ्या, लुटमार आणि दहशतवादी कारवाया वाढत असल्यामुळे दि. २३ जून १९९२ राज्यातील महामार्गावर 'महामार्ग सुरक्षा गस्त योजना' सुरु करण्यात आली. याकरिता एक पोलीस उपमहानिरीक्षक, ३ पोलीस उपअधीक्षक, पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक व अंमलदार अशी एकूण २६८ नवीन पदे निर्माण करण्यात आली.

- दिनांक २३ मार्च १९९३ रोजी शासनाने काढलेल्या अधिसुचने नुसार राज्यातील २९ वाहतूक मदत केंद्रे, राज्य वाहतूक शाखेची मंडळ कार्यालये व बोरघाट वाहतूक व्यवस्था ही संबंधीत शहर व जिल्हा पोलीस आस्थापनेकडून पोलीस उप महानिरीक्षक महामार्ग गस्त योजना, म.रा., मुंबई यांचे अधिपत्याखाली आणण्यात आली.

- दिनांक ११ सप्टेंबर १९९६ चे शासन निर्णयानुसार राज्यातील महामार्गावरील वाहतूक सुरक्षा यंत्रणेमध्ये कार्यरत असलेली ११ महामार्ग सुरक्षा पथके आणि २५ वाहतूक मदत केंद्राचे कामकाजामध्ये नियोजनबंध

रितीने सुसुत्रता आणण्यासाठी आणि प्रभावीपणे वाहतूक यंत्रणेमध्ये समन्वय साधण्यासाठी वाहतूक मदत केंद्र व सुरक्षा पथकाचे एकत्रीकरण करुन आकृतीबंधावर आधारीत ३६ वाहतूक केंद्रांचे पुर्नगठीत करुन सदर यंत्रणेला ''महामार्ग पोलीस'' या नावाने संबोधण्यात आले.

➢ डिसेंबर १९९३ ला पोलीस उपमहानिरीक्षक (वाहतूक) या पदाची श्रेणीवाढ करुन विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) या पदाची निर्मिती करण्यात आली. तद्नंतर वेळोवेळी काढण्यात आलेल्या शासननिर्णयानुसार महामार्ग पोलीस विभागातील नवीन वाहतूक मदत केंद्रांची आणि आवश्यक मनुष्यबळाची पदे निर्माण करण्यात आली . २००७ रोजी काढलेल्या शासननिर्णया नुसार विशेष पोलीस महानिरीक्षक (वाहतूक) या पदाची श्रेणीवाढ करुन अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) करण्यात आले.

## महामार्ग पोलीस दलाची आस्थापना, संरचना :-

➢ महामार्ग पोलीस विभागाचे अपर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई हे प्रमुख असून त्यांचे कार्यालय मोती महल, ६ वा मजला, जे.डी. टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई ४०० ०२० येथे आहे. अपर पोलीस महासंचालक (वाहतुक) यांच्या अधिपत्याखाली महामार्ग पोलीस विभागाची एकुण ५ परिक्षेत्रे अनुक्रमे ठाणे, रायगड, पुणे, औरंगाबाद व नागपूर ही कार्यरत आहेत. सदर परिक्षेत्राचे प्रमुख पोलीस अधीक्षक असून त्यांच्या अधिपत्याखाली १ पोलीस उप अधीक्षक, ३ ते ४ पोलीस निरीक्षक कार्यरत असतात. प्रत्येक पोलीस निरीक्षक यांच्या अधिकारात ४ ते ७ इतकी म.पो.केंद्रे कार्यरत आहेत.

➢ राज्यामधील राष्ट्रीय/राज्य/द्रुतगती मार्गावर **महामार्ग पोलीस विभागाअंतर्गत एकूण ६३ महामार्ग पोलीस वाहतुक मदत केंद्र** कार्यरत आहेत. प्रत्येक केंद्रांवर सर्वसाधारपणे १ ते ३ सपोनि/पोउनि व सुमारे ३० पोलीस कर्मचारी हे कर्तव्यास असतात.

➢ महामार्ग पोलीस मुख्यालयामध्ये १ पोलीस अधीक्षक (मुख्यालय), ०३ पोलीस निरीक्षक, ०२ सहायक पोलीस निरीक्षक, ०३ पोलीस उप निरीक्षक व ४० पोलीस अंमलदार तसेच १ वरिष्ठ कार्यालय अधीक्षक व ०३ कर्मचारी असे मंत्रालयीन कर्मचारी कार्यरत आहेत. महामार्ग पोलीस मुख्यालयामध्ये वाहतुक अभियांत्रीकी कक्ष असून यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांची नेमणुक असते.

➢ महामार्ग पोलीस विभागाचे मंजुर व कार्यरत संख्याबळ खालील प्रमाणे आहे.

| HIGHWAY TRAFFIC (H.S.P) MANPOWER | | |
|---|---|---|
| SR.No. | Officer | Sanctioned strength |
| 1 | Addl.D.G.P.(Tr.) | 1 |
| 2 | S.P. | 6 |
| 3 | Dy.S.P. | 6 |
| 4 | P.I. | 19 |
| 5 | API/ PSI | 225 |
| 7 | ASI/HC /PN/PC/Driver | 2760 |
| | **Total** | **3017** |

## नेमणूक व प्रतिनियुक्तीचे निकष :-

**पोलीस अधिकारी** - महामार्ग पोलीस विभागात कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यांची नेमणूक मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकडून केली जाते. महामार्ग पोलीस विभागातील पोलीस आस्थापना मंडळामार्फत संबंधित अधिकाऱ्यांची विनंती व महामार्ग पोलीस केंद्रांतील रिक्त पदे यांचा विचार करून अधिकाऱ्यांना पदस्थापना देण्यात येते.

**पोलीस अंमलदार** - महामार्ग पोलीस दलात प्रतिनियुक्तीवर निवडण्यात येणाऱ्या पोलीस अंमलदारांची निवड पाच वर्षासाठी विहित निकषांनुसार करण्यात येते. संबंधित घटकांकडून विहित निकष पुर्ण करणाऱ्या अंमलदारांची प्रतिनियुक्तीवर निवड करण्यासाठी एकास तीन या प्रमाणात यादी मागविण्यात येते. अपर पोलीस महासंचालक (वाहतूक) यांच्या अध्यक्षतेखालील **पोलीस आस्थापना मंडळामार्फत** प्रतिनियुक्तीवरील अंमलदारांची निवड करण्यात येते. निवडीचे निकष पुढील प्रमाणे आहेत -

| | | |
|---|---|---|
| १) | **वय / किमान सेवा :-** | **पोलीस शिपाई वय:**- ३५ वर्षापर्यंत व कमीत कमी ५ वर्षे सेवा.<br>**पोलीस नाईक वय :** - ४० वर्षापर्यंत.<br>**सहायक पोलीस उप निरीक्षक/पोलीस हवालदार** :- १५ वर्ष सेवा.<br><br>सहायक पोलीस उप निरीक्षक व पोलीस हवालदार यांचा एक संवर्गात तसेच पोलीस नाईक व पोलीस शिपाई यांचा एका संवर्गात विचार करण्यात येतो. |
| २) | **भाषाज्ञान:-** | मराठी व इंग्रजी भोषेचे ज्ञान असावे. |
| ३) | **वाहन परवाना:-** | चारचाकी व दुचाकी वाहन चालविण्याचा परवाना असणे आवश्यक आहे. (जीप, सुमो इत्यादी चालविता येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. ) |
| ४) | **स्वच्छ चारि त्र्य :-** | पोलीस कर्मचारी यांच्या विरूध्द कोणत्याही स्वरूपाचा गुन्हा दाखल नसावा, कोणतीही विभागीय चौकशी/ प्राथमिक चौकशी, प्रलंबित अथवा प्रस्तावित नसावी, तसेच यापूर्वी कोणत्याही प्रकरणात निलंबित झालेला नसावा.<br>सौम्य शिक्षा ०५ पेक्षा जास्त नसाव्यात.(सक्त ताकीद व ताकीद) |
| ५) | **शारिरीक पात्रता:-** | शारिरीक दृष्टया तंदुरूस्त असावा. |
| ६) | **शेरे:-** | मागील १० वर्षाचे वार्षिक शेरे विचारात घेतले जातील. तथापि, अर्ज दिनांकापासून मागील ०५ वर्षामध्ये प्रतिकुल शेरे नसावेत. (उदा. ब -) |
| ७) | **महामार्ग विभागात पुनर्नियुक्ती:-** | यापूर्वी महामार्ग पोलीस केंद्रामध्ये कोणत्याही पदावर काम केलेले नसावे. (सफौ/पोहवा/पोना/पोशि/चालक पदावर) |
| ८) | **संगणक अर्हता:-** | संगणकाचे ज्ञान असावे. |
| ९) | **घटक प्रमुखांची शिफारस:-** | कोणत्याही परिस्थितीत संबधित पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांची शिफारस असल्याशिवाय त्यांचा अर्जाचा विचार केला जात नाही. |
| १०) | **बक्षिस प्राधान्य** | पोलीस कर्मचारी यांची निवड करतांना बक्षिसांची संख्या विचारात घेतली जाते, जास्त बक्षिसे असणाऱ्यांना प्राधान्य देण्यात येते. |

## महामार्ग पोलीस दलाचे कार्यक्षेत्र :-

➢ महामार्ग पोलीस विभागाच्या कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्यातील ९८ राष्ट्रीय महामार्ग (१७,७५७ कि.मी.), ३८२ राज्य महामार्ग (३५,७५४.६८ कि.मी.) आणि मुंबई - पुणे द्रुतगती मार्ग (९४.५ कि.मी.) आहेत.

## महामार्ग पोलीस दलाचे उद्दिष्टे :-

१) राज्यातील रस्ते व प्राणांतिक अपघात कमी करण्यासाठी सर्वकष प्रयत्न करणे

२) राष्ट्रीय व राज्य महामार्गावर अपघातग्रस्तांना तात्काळ मदत करणे

३) अपघाताची सूचना संबंधीत पोलीस ठाणेस देणे

४) अपघात करून पळून गेलेल्या वाहनांचा शोध घेणे.

५) वाहतुकीची कोंडी दूर करणे

६) महामार्गावर अडकून पडलेल्या वाहनांच्या चालकांना मदत करणे

७) नादुरुस्त/बंद वाहनांना महामार्गावरुन बाजूला करून वाहतुक सुरळीत करणे

८) महामार्गावरुन वाहनाने प्रवास करणाऱ्या नागरीकांना दवाखाने, पेट्रोलपंप, पोलीस ठाणे व विश्रामगृहाबाबत माहिती देणे.

९) महामार्गावर वाहतूक सुरळीत राहिल याची दक्षता घेणे.

१०) महामार्गावरील चोरी, जबरी चोरी व दरोडया सारख्या गुन्हयाना प्रतिबंध करणे.

११) महामार्गावर मोटार वाहन अधिनियमाचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर प्रचलित अधिनियमान्वये कारवाई करणे.

( महामार्ग सुरक्षा पथकास शासन निर्णय क्रमांक एमव्हीआर क्र. ०८०७/४०९/ परि-२, गृह विभाग, मुंबई, दिनांक ०४/०८/२००९ नुसार मोटार वाहन कायद्या अंतर्गत कलम १७७, १८०, १८१, १८३ (१)(२), १८४, १८९, १९२ (१), १९६ अन्वये कारवाई करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत.)

१२) मा. सर्वोच्च न्यायालय समितीने महामार्गावरील अपघात कमी करण्याबाबत दिलेल्या निर्देशांची पुर्तता करणे. (मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार देशातील रस्ते अपघाताची संख्या कमी करण्यासाठी रस्ते सुरक्षा समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीचे अध्यक्ष मा. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधिश असतात. सदर समितीने रस्ते अपघात आणि त्यामध्ये होणाऱ्या मृत्युंमध्ये दरवर्षी १० टक्के घट करण्याचे निर्देश दिले आहेत. त्याकरीता सदर समितीकडून रस्ते अपघात कमी करण्यासाठी सर्व राज्यांना विविध उपाययोजना करण्याचे निर्देश दिले जातात आणि केलेल्या उपाययोजनांबाबत सदर समितीकडून तिमाही आढावा घेण्यात येतो.)

# पोलीस विभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची कर्तव्ये

१) पोलीस उप अधिक्षक महामार्ग पोलीस, विभागीय पोलीस निरीक्षक, म.पो.केंद्र प्रभारी अधिकारी व त्यांचे हाताखालील इतर अधिकारी व कर्मचारी यांना मार्गदर्शन करतील. तसेच परिक्षेत्रातील मुख्य पोलीस अधिक्षक या नात्याने नियंत्रणा खालील येणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना योग्य प्रकारे प्रशिक्षण देणे, कार्यक्षम ठेवणे, अधिकारी व कर्मचारी यांच्यात शिस्त राखण्याचे दृष्टीकोनातुन त्यांचे दैनंदिन कामकाजावर देखरेख ठेवणे, तसेच अधिनस्थ कर्मचाऱ्यांच्या अडचणी सोडविण्यासाठी योग्य ती कार्यवाही करणे.

२) पोलीस अधिक्षक हे ५ किंवा ५ पेक्षा अधिक इसमांचा मृत्यू झालेल्या प्राणांतीक अपघातास भेट देवून मार्गदर्शन करतील. पोलीस उप अधिक्षक हे ३ किंवा ३ पेक्षा अधिक इसमांचा मृत्यू झालेल्या प्राणांतीक अपघातास भेट देवून मार्गदर्शन करतील व पोलीस निरीक्षक हे २ किंवा २ पेक्षा अधिक इसमांचा मृत्यू झालेल्या प्राणांतीक अपघातास भेट देवून मार्गदर्शन करतील. महामार्ग पोलीस केंद्र प्रभारी अधिकारी हे त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक अपघातास भेट देवून अपघाताच्या कारणांचे विश्लेषण करतील.

३) वाहतुक नियमनाच्या दृष्टीने योग्य ते निर्देश देणे, नियमन करणे व रस्ता वळविणे (डायव्हेंशन करणे) व वाहनांचे मार्ग ठरविणे.

४) जिल्हा पोलीस अधीक्षक व रस्त्याची देखभाल करणारे इतर विभाग (PWD/NHAI/MSRDC/Local Authority) यांचेशी समन्वय साधणे.

५) नागरीकांमध्ये रस्ते अपघाताबाबत जनजागृती करण्यासाठी महामार्गालगत असणाऱ्या गावात, शाळा, महाविदयालय, टोल प्लाझा, साखर कारखाने, इंडस्ट्री, कारखाने, एमआयडीसी इत्यादी ठिकाणे रस्ते सुरक्षाबाबत कार्यक्रमांचे आयोजन करणे.

६) चांगल्या कामाची प्रसिध्दी वृत्तपत्र व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांच्या माध्यमातून करणे.

७) राष्ट्रीय व राज्य महामार्ग व द्रुतगती मार्गावर होणाऱ्या अपघातांच्या कारणाची माहिती घेऊन पुन्हा त्या ठिकाणी अपघात होणार नाहीत याबाबत योग्य त्या उपाययोजना करण्यासाठी संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करणे.

८) आपल्या कार्यक्षेत्रातील महामार्गावरील ब्लॅक स्पॉटना भेटी देवून त्या ठिकाणी करावयाच्या अल्प/मध्यम/ दिर्घ उपाययोजना संबंधीत विभागास सुचवाव्यात व त्या करून घेण्याबाबत पाठपुरावा करणे.

९) सर्वोच्च न्यायालय व रस्ता सुरक्षा समितीने दिलेल्या निर्देशानुसार महामार्गावरील अपघात हे प्रत्येक वर्षी १० टक्क्यांनी कमी करण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करणे.

१०) महामार्गावरील अपघात कमी करण्यासाठी, तसेच वाहतुकीस शिस्त लागावी यासाठी कसुरदार वाहन चालकांविरूध्द प्रभावीपणे कारवाई करण्यासाठी अधिकारी व अंमलदार यांना मार्गदर्शन करणे.

११) महामार्गावर ज्या कारणांमुळे अपघात होतात (उदा. विना हेल्मेट, विना सिटबेल्ट, अतिवेग, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर करणे, धोकादायक व बेकायदेशिरपणे प्रवासी वाहतुक करणे, विना रिफ्लेक्टर व टेललाईट इ.) त्या मुख्य शिर्षकाअंतर्गत प्रभावीपणे कारवाई होईल याबबात दक्ष राहणे.

१२) आपल्या कार्यक्षेत्रातील राष्ट्रीय महामार्गास मिळणारे रस्त्यांच्या ठिकाणी (जंक्शन पॉईंट) अपघात होऊ नयेत यासाठी योग्य त्या उपाययोजना करण्याबाबत (उदा. स्पीड ब्रेकर/रम्बलर टाकणे, सिग्नल/ब्लिंकरर्स बसविणे, हायमास्ट बसविणे, निर्देशक फलक बसविणे इत्यादी) संबंधीत विभागांशी समन्वय साधून पाठपूरावा करणे.

१३) आपल्या कार्यक्षेत्रातील घाटरस्त्याची पाहणी करून दरड कोसळणारी ठिकाणे व अतघात क्षेत्र येथे उपाययोजना करण्याबाबत संबंधीत विभागाकडे पाठपुरावा करणे.

१४) महत्वाच्या व्यक्तिंच्या प्रवासाच्या वेळी महामार्गावरील वाहतुक सुरळीत व सुरक्षित ठेवणे.

१५) जखमी प्रवासी व चालक इत्यादीना वैद्यकिय सुविधा तात्काळ मिळणेसाठी प्रयत्नशिल राहणे.

१६) वाहतुक विषयक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर मोटार वाहन कायद्यानुसार दंडात्मक कारवाई करणे.

१७) वाहतुकीचे परिस्थिती व प्रसंगानुसार योग्य ते नियमन करणे.

१८) प्रभारी अधिकारी यांनी म.पो. केंद्राच्या हद्दीत अपघात झाल्यास तात्काळ महामार्ग पोलीस मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई व महामार्ग पोलीस विभाग संबंधीत प्रादेशिक नियंत्रण कक्ष येथे माहिती देवून तात्काळ कर्मचाऱ्यांसह अपघातस्थळी रवाना व्हावे. अपघातस्थळी पोहचल्यावर अपघाताचे स्वरूप गंभीर असल्यास व अतिरिक्त मदतीची आवश्यकता भासल्यास तात्काळ नियंत्रण कक्षास माहिती देवून लगतच्या म.पो.केंद्राची मदत घ्यावी. ज्या म.पो.केंद्राच्या प्रभारी अधिकारी यांच्याकडे मदतीची मागणी केली आहे. त्या म.पो.केंद्राच्या प्रभारी अधिकारी यांनी स्वत: व पुरेशा कर्मचारी वार्गासह घटनास्थळी रवाना होणे.

१९) प्रभारी अधिकारी यांनी म.पो. केद्राच्या हद्दीत येणाऱ्या स्थानिक पोलीस ठाणेच्या संपर्कात राहून वाहतूक तसेच पोलीस ठाण्याअंतर्गत येणाऱ्या विविध सण, उत्सव, महत्वाचे व्यक्तीचे बंदोबस्त, मोर्चे, रस्ता रोको, निदर्शने यासंदर्भात करावयाच्या बंदोबस्ताबाबत समन्वय साधणे.

२०) प्रभारी अधिकारी यांनी म.पो. केंद्राचे हद्दीतील सार्वजनिक बांधकाम विभाग, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांचेशी संपर्कात राहून दरमहा एकदा मिटींग आयोजित करून नविन रस्त्यांची कामे, रस्ता रूंदीकरणाची कामे, रस्ता दुरूस्ती व देखभाल, पावसाळयातील होणारे खड्डे, अपघात प्रवण क्षेत्र आणि त्याबाबतच्या उपाययोजना याबाबत चर्चा करतील. तसेच महामार्गावरील विविध आवश्यक ठिकाणी उदा. शाळा, महाविद्यालये,

आरोग्यकेंद्रे, गतीरोधक इत्यादी बाबतचे फलक लावणे तसेच रस्त्यावरील पट्टे, कॅट आईज, आवश्यकतेप्रमाणे सिग्नल, हायमास्ट बसविणे इत्यादी बाबत सविस्तर आढावा घेणे.

२१) प्रभारी अधिकारी यांनी म.पो. केंद्राचे हद्दीत असणाऱ्या शाळा, महाविदयालय, हॉस्पीटल, इंडस्ट्रीयल कंपनी, साखर कारखाने, अग्निशमक केंद्रे, सरकारी कार्यालये, सराकारी रूग्णालय, खाजगी रूग्णालये, हॉटेल्स्, धाबे, लॉजेस्, पेट्रोल पंप, गॅरेजेस् वाहतूक विषयक प्रशिक्षक, रासायनिक तज्ञ, टोलनाके चालविणारी कंपनी/ ऑपरेटर तसेच त्यांच्याकडे उपलब्ध ॲम्ब्युलन्स व क्रेन, खाजगी ॲम्ब्युलन्स, क्रेन व वेल्डर यांची माहिती संकलीत करतील व सदरची माहिती संबंधीतांच्या पत्ता व दुरध्वनी क्रमांकासह म.पो. केद्रांतील रजिस्टरमध्ये संकलीत करून ठेवणे.

२२) सेवाभावी स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने महामार्गावर रस्ते सुरक्षा संबंधी जनजागृतीपर फलक/होर्डीग लावणे.

२३) महामार्गावर गस्त करून प्रवाशांना सुरक्षा प्रदान करणे, महामार्गावरुन वाहनाने प्रवास करणाऱ्या नागरीकांना दवाखाने, पेट्रोलपंप, पोलीस ठाणे व विश्रामगृहाबाबत माहिती देणे, महामार्गावर वाहतूक सुरळीत राहिल याची दक्षता घेणे व अपघाताची सूचना संबंधीत पोलीस ठाणेस देणे.

२४) महामार्गावर अडकून पडलेल्या वाहनांच्या चालकांना मदत करतील व नादुरुस्त/बंद वाहनांना महामार्गावरुन बाजूला करून वाहतुक सुरळीत करणे.

२५) प्रवाश्यांसोबत सौजन्याने वागतील व सभ्यतेची वागणुक देणे.

२६) मुंबई पोलीस कायदा ६६ प्रमाणे वाहतुक नियमनाशी संबंधित सर्व कर्तव्ये पार पाडणे.

२७) महामार्ग पोलीस रस्ता सुरक्षेतेच्या दृष्टीने वरिष्ठांनी जारी केलेले परिपत्रक व निरीक्षण टिप्पणी, शासन आदेशाची माहीती घेवुन त्याप्रमाणे कार्यवाही करतील.

२८) महामार्ग पोलीस मुख्यालयातील अपघात विश्लेषण कक्षाकडून प्राणांतिक अपघाताचे विश्लेषण करणे.

## महामार्ग पोलीस विभागाकडून अहवाल सादरीकरण (Reporting) -

१) राज्यातील महामार्गावर घडणाऱ्या महत्वाच्या घटना व गंभीर अपघातांची माहिती तातडीने पोलीस महासंचालक कार्यालयाच्या नियंत्रण कक्षास तातडीने सादर केली जाते. त्याचप्रमाणे अशा घटना व अपघातांचा सविस्तर अहवाल सादर केला जातो.

२) राज्यातील अपघात व मोटार वाहन अधिनियमांतर्गत करण्यात येणाऱ्या कारवाया यांचा अहवाल दरमहा सादर करणे.

३) राज्यात घडणाऱ्या सर्व अपघातांचे सविस्तर विश्लेषण करून दरवर्षी **ROAD ACCIDENTS IN MAHARASHTRA** ही पुस्तिका प्रकाशित करणे.

-----------